Volume - 4 (2024)
Issue - 2 (April)

LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science

ISSN
2583-2549

# वर्तमानपत्र आणि महाविद्यालयीन विद्यार्थी : एक अध्ययन

**डॉ. स्मिता गिरी**
ग्रंथपाल
महिला महाविद्यालय
नागपूर

---

**सारांश :** आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विविध विषयावरील अद्यावत माहिती पुरविणारे साधन म्हणून वर्तमानपत्रे महत्वाची भूमिका बजावतात.महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत ग्रंथालय वाचकांना त्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत मदत करण्याकरिता देण्यात येणाऱ्या विविध सेवा,सुविधां सोबतच वर्तमानपत्र सेवा सुध्दा देण्यात येते. प्रस्ततु अभ्यासात विद्यार्थिनींच्या (महिला महाविद्यालय, नागपूरच्या ग्रंथालय वाचन कक्षाच्या उपयोग करणाऱ्या) वृत्तपत्र वाचण्याच्या सवयींशी संबंधित विविध पैलूंचा अभ्यास करण्याचा लेखकाद्वारे प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**शब्दसंज्ञा :** ग्रंथालय सेवा, वर्तमानपत्र सेवा, महाविद्यालयीन विद्यार्थी

---

**प्रस्तावना :**

मनुष्य एक समाजशील प्राणी आहे. समाजात रोज नवनवीन घटना घडतात त्या मानवी जीवनाला प्रभावित करतात. छोट्या छोट्या घटना जाणून घेण्यासाठी आपण उत्सुक असतो. जसजसा आपला बौद्धिक स्तर उंचावत जातो तसतसे आपण जगभरातील घटनांची माहिती मिळवू इच्छितो, या आपल्या जिज्ञासेची तृप्ती वृत्तपत्र (वर्तमानपत्र) करते. 'वृत्तपत्र' म्हणजे मुख्यतः वार्ता तसेच मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन होय.

आजच्या युगात वर्तमानपत्रे ही आपल्या दैनंदिन गरजांपैकी एक आहे.वर्तमानपत्रात स्थानिक घडामोडी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण ,साहित्य, कला, क्रीडा, आणि सांस्कृतिक घडामोडी , मनोरंजन, फॅशन, वित्त, जाहिराती, माहितीपूर्ण लेख ,संपादकीय आणि अभिप्राय इत्यादी विविध विभागांमध्ये विभागलेले असते. वर्तमानपत्राद्वारे आपल्याला जगात कुठे काय घडले ते समजते. स्थानिक, देशांतर्गत आणि जागतिक स्वरूपाच्या विविध अद्यावत बातम्या ताबडतोब पुरविणे ,लोकमत घडविणे, लोकमताचे नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, व प्रभावशाली बदल घडवून आणणे, जाहिराती द्वारे उद्योग व व्यवसायाला चालना देणे, अशा विविध उद्दिष्टांनी वृत्तपत्रीय माध्यम अधिक प्रभावी ठरलेले आहे.

**वृत्तपत्रांचे प्रमुख प्रकार म्हणजे**: दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिक वृत्तपत्रे, खास आस्थाविषयक वार्तापत्रे,

वृत्तनियतकालिके.

**दैनिक वृत्तपत्रे :**

या वर्तमानपत्रांच्या उद्देश जागतिक, राष्ट्रीय स्थानिक ताज्या बातम्या कमी अधिक प्रमाणात महत्वानुसार प्रकाशित करणे, विभिन्न वाचक प्रकारानुसार खास सदर व पुरवण्या प्रकाशित करणे, मनोरंजनात्मक पूरक राजकीय मजकूर देणे. दैनिक वर्तमानपत्रांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते संपूर्ण जगाचा आरसा मानवाच्या हातात देतात.

**साप्ताहिक वृत्तपत्रे :** दैनिक वृत्तपत्रांपेक्षा ह्यांचे विषयक्षेत्र मर्यादित असते व वाचक वर्ग सुद्धा मर्यादित असतो.

**खास आस्थाविषयक वार्तापत्रे :** उद्योग, मोठ्या कंपन्या आपल्या सदस्याकरिता अशी वृत्तपत्रे प्रकाशित करतात.

**वृत्तनियतकालिके :** विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण जागतिक घटना व बातम्या सविस्तर रूपामधे प्रकाशित केल्या जातात.

**वर्तमानपत्राचे महत्त्व :**

वृत्तपत्राचे महत्त्व आपल्या सर्वांना माहीत आहे.वर्तमानपत्रे ही माहितीचा अत्यावश्यक स्रोत म्हणून काम करतात, वाचकांना वर्तमान घडामोडी, राजकारण, व्यवसाय, क्रीडा आणि मनोरंजन याबद्दल माहिती देतात. वर्तमानपत्रात प्रकाशित कविता, कथा, नाटक, निबंध, व्यंग्य इत्यादींच्या माध्यमातून वाचकांचे मनोरंजनच होत नाही, तर ज्ञानही वाढते. वर्तमानपत्राद्वारे आपल्याला जगातील सर्व महत्वाच्या घटनांमागील कारणे व त्यांचे परिणाम याबद्दल माहिती मिळते. वैज्ञानिक आविष्कार, शोध, अपघात, राष्ट्रांचे परस्पर संबंध आणि तणाव, दंगली, संप आणि गुन्हे याविषयी वर्तमानपत्रात वाचून आपल्या वर्तमान जगाच्या हालचालींचे संपूर्ण ज्ञान मिळते.

**महाविद्यालय ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्र सेवा :**

महाविद्यालयीन विद्यार्थी ज्ञान प्राप्त करण्याकरिता व तसेच अभ्यासाकरिता लागणाऱ्या वाचन साहित्याच्या उपयोग करण्याकरिता ग्रंथालयात जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वाचकांना पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षांशी संबंधित पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, हस्त लिखिते, शोध प्रबंध व इतर वाचन साहित्य उपलब्ध करून दिली जातात. विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध वाचन साहित्य बद्दल ग्रंथालयातर्फे विविध प्रकारचे यूजर एज्युकेशन प्रोग्राम/ ग्रंथालय ओरिएंटेशन प्रोग्राम घेऊन माहिती देण्यात येते. महाविद्यालयाच्या वाचन कक्ष सुसज्ज असून वाचकांना वाचन कक्षामध्ये विविध वर्तमानपत्रे उपलब्ध करून दिली जातात.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात लोकमत, तरुण भारत, द हितवाद, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ, द इंडियन

एक्सप्रेस असे एकूण सहा वर्तमानपत्र येतात. वर्तमानपत्र वाचनाची आवड असणारे विद्यार्थी वेळ मिळाल्यास ग्रंथालयात वर्तमानपत्र वाचायला येतात. वर्तमानपत्रात येणाऱ्या महाविद्यालयीन कार्यक्रमाच्या बातम्यांची कात्रण जतन करून माहिती करिता वाचकांना उपलब्ध करून दिले जातात.ग्रंथालयात येणाऱ्या रोजगार विषयक वर्तमानपत्रातून (साप्ताहिक) काही निवडक रोजगार संबंधित माहिती सूचना फलक मार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येते.

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विविध विषयावरील अद्यावत माहिती पुरविणारे साधन म्हणून वर्तमानपत्रे अग्रगण्य ठरतात व तसेच विविध विषयांवर अद्यावत माहिती पुरविण्यात वर्तमानपत्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञान कक्षा विस्तारित करण्याकरिता व तसेच विविध विषयावरील अद्यावत माहिती ठेवण्याकरिता वर्तमानपत्रांचा उपयोग करावा या उद्देशाने ग्रंथालय कर्मचारी सतत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करीत असते.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

- विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र वाचणे आवडते का हे जाणून घेणे.
- वर्तमानपत्राच्या कोणत्या स्वरूपाला विद्यार्थ्यांची पसंती आहे हे जाणून घेणे.
- वर्तमानपत्र वाचण्याकरिता इंटरनेटचा वापर करतात काय हे जाणून घेणे.
- प्राधान्यकृत स्वरूपात वर्तमानपत्र वाचण्याची वारंवारता जाणून घेणे.
- वर्तमानपत्रात कोणत्या विषयाच्या बातम्या वाचतात हे जाणून घेणे.
- महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या वृत्तपत्र विषयक सेवांच्या विद्यार्थी उपयोग करतात काय हे जाणून घेणे.
- वृत्तपत्र वाचनाचा ध्येय जाणून घेणे.
- ग्रंथालय मार्फत देण्यात येणाऱ्या वृत्तपत्र सेवेबाबत संतुष्टता जाणून घेण्याबाबत.

**संशोधन पद्धती :**

अभ्यासाकरिता महिला महाविद्यालय नागपूर, ग्रंथालयाच्या वाचन कक्षाच्या उपयोग करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी (सत्र 2023——24 मध्ये प्रवेशित) 70 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती. प्रस्तुत अभ्यासात विद्यार्थिनींच्या वृत्तपत्र वाचनाच्या सवयींशी संबंधित विविध पैलूंचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सर्वेक्षण करण्यासाठी 11 प्रश्नांची (प्रामुख्याने वस्तुनिष्ठ शैलीचेप्रश्न) प्रश्नावली तयार करून माहिती संकलित करण्यात आलेली होती . संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले .


**LIBRARY SCHOLAR**
*International Peer-Reviewed Journal of Library Science*
ISSN 2583-2549

**अभ्यासाचे विश्लेषण खाली नमूद केले आहे:**

**तक्ता क्र. 1: सहभागी विद्यार्थ्यांचे वर्गानुसार विश्लेषण**

| वर्ग | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| बी ए भाग 1 | 12 | 17.1 |
| बी ए भाग 2 | 28 | 40 |
| बी ए भाग 3 | 22 | 31.4 |
| एम ए भाग 1 | 3 | 4.3 |
| एम ए भाग 2 | 5 | 7.1 |

आलेख क्रमांक : 1





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 1 दर्शविते की सहभागी झालेल्या एकूण 70 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी 12 विद्यार्थी (17.1%) बी ए भाग 1, 28 विद्यार्थी (40%) बी ए भाग 2, 22 विद्यार्थी (31.4%) बी ए भाग 3 , तर 8 विद्यार्थी (11.4%) एम ए चे होते.

**तक्ता क्र. 2 : सहभागी विद्यार्थ्यांचे वय विश्लेषण**

| आयुवर्ग | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| 21 वर्षापेक्षा कमी | 49 | 70 |
| 21—25 वर्ष | 16 | 22.9 |
| 25—30 वर्ष | 3 | 4.3 |
| 30 वर्षापेक्षा जास्त | 2 | 2.9 |

आलेख क्रमांक : 2





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 2 सहभागी विद्यार्थ्यांचे त्यांच्या वयाच्या आधारावर वर्गीकरण दर्शविते. जास्तीत जास्त 21 वर्षांपेक्षा कमी वयोगटातील 70%, 21-25 वर्षे 22.9%, 4.3% विद्यार्थी 25-30 वयोगटातील आहेत आणि उर्वरित 2.9% विद्यार्थी 30 वर्षांपेक्षा जास्त आहेत.

**तक्ता क्र. 3: वर्तमानपत्र वाचनाची आवड असणारे विद्यार्थी**

| वर्तमानपत्र वाचनाची आवड | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 70 | 100 |
| नाही | 00 | 00 |

आलेख क्रमांक : 3





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 3 दर्शविते की अभ्यासात सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र वाचण्याची आवड होती.

**तक्ता क्र. 4 : विद्यार्थ्यांचे वर्तमानपत्राचे पसंतीचे स्वरूप**

| वर्तमानपत्राचे स्वरूप | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| ई-वर्तमानपत्र | 29 | 41.4 |
| प्रिंट फॉर्म | 41 | 58.6 |

आलेख क्रमांक : 4





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 4 दर्शविते की अधिकाधिक 41(58.6%) विद्यार्थ्यांना प्रिंट स्वरूपात तर 29 (41.4%) विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात वर्तमानपत्र (ई-वर्तमानपत्र) वाचायला आवडते.

**तक्ता क्र. 5: वर्तमानपत्र वाचण्याकरिता इंटरनेटचा वापर**

| वर्तमानपत्र वाचण्याकरिता इंटरनेटचा वापर | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| होय | 50 | 71.4 |
| नाही | 20 | 28.6 |

आलेख क्रमांक : 5




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 5 दर्शविते की 71.4 % विद्यार्थी वर्तमानपत्र वाचण्याकरिता इंटरनेटचा वापर करतात.

**तक्ता क्र. 6: वर्तमानपत्र वाचण्याची वारंवारता**

| वर्तमानपत्र वाचण्याची वारंवारता | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| दररोज | 19 | 27.1 |
| कधीकधी | 51 | 72.9 |
| क्वचितच | 00 | 00 |
| कधीच नाही | 00 | 00 |

आलेख क्रमांक : 6





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 6 दर्शविते की अधिकाधिक 72.9% विद्यार्थी वर्तमानपत्राचे वाचन कधी कधी करतात तर 27.1% विद्यार्थी दररोज वर्तमानपत्राचे वाचन करतात .

**तक्ता क्र. 7: वर्तमानपत्र वाचण्यासाठी देण्यात येणारा वेळ**

| वाचण्यासाठी देण्यात येणारा वेळ | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| 30 मिनिटापेक्षा कमी | 47 | 67.1 |
| 30 मिनिट—एक तास | 21 | 30 |
| एक तास —दोन तास | 00 | 00 |
| दोन तासांपेक्षा जास्त | 2 | 2.9 |

आलेख क्रमांक : 7





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 7 दर्शविते की जास्तीत जास्त 67.1% टक्के विद्यार्थी अर्धा तास पेक्षा कमी वर्तमान पत्राचे वाचन करतात,30% विद्यार्थी एक तासापेक्षा कमी वर्तमानपत्राचे वाचन करतात तर दोन तासापेक्षा जास्त वर्तमानपत्राचे वाचन करणारे विद्यार्थ्यांची संख्या फक्त 2.9% आहेत.

**तक्ता क्र. 8: वर्तमानपत्र वाचण्यासाठी पसंतीची भाषा**

| वाचण्यासाठी प्राधान्य भाषा | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| मराठी | 51 | 72.9 |
| हिंदी | 24 | 34.3 |
| इंग्रजी | 11 | 15.7 |
| इतर | 00 | 00 |

आलेख क्रमांक : 8




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 8 दर्शविते की 51(72.9%)विद्यार्थ्यांना (72.9%) मराठी भाषेत वर्तमानपत्र वाचायला आवडतात तर 24(34.3%)विद्यार्थ्यांना हिंदी भाषेत वर्तमानपत्र वाचायला आवडतात. 11(15.7%)

Volume - 4 (2024)
Issue - 2 (April)

LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science


ISSN
2583-2549

विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत मध्ये वर्तमानपत्र वाचायला आवडते.

**तक्ता क्र. 9 : विषयानुसार बातम्यांना प्राधान्य देणे**

| विषयाचे नाव | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| राजकीय | 41 | 58.6 |
| आर्थिक | 26 | 37.1 |
| विज्ञान विषयक | 24 | 34.3 |
| कायदेविषयक | 17 | 24.3 |
| संपादकीय | 7 | 10 |
| प्रशासकीय | 12 | 17.1 |
| व्यापार विषयक | 15 | 21.4 |
| मनोरंजनात्मक | 33 | 47.1 |
| शैक्षणिक | 36 | 51.4 |
| खेळ संबंधित | 27 | 38.6 |
| धर्मविषयक | 8 | 11.4 |
| पर्यावरण विषयक | 21 | 30 |
| अंतराळ विषयक | 9 | 12.9 |
| सामाजिक | 32 | 45.7 |
| संस्कृती विषयक | 22 | 31.4 |

आलेख क्रमांक : 9




वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 9 दर्शविते की 58.6% विद्यार्थ्यांना राजकीय विषयावरील बातम्या वाचायला आवडते, 51.4% विद्यार्थ्यांना शैक्षणिक बातम्या, 45.7% विद्यार्थ्यांना सामाजिक विषयावरील बातम्या वाचायला आवडते तर सर्वात कमी 10% संपादकीय माहिती वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आहे .

**तक्ता क्र. 10 : ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्र संबंधी सेवांचा उपयोग**

| वर्तमानपत्र संबंधी सेवा | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| वर्तमानपत्र कात्रण सेवा | 19 | 27.5 |
| वर्तमानपत्र प्रतिलिपी सेवा | 7 | 10.1 |
| रोजगार विषयक वर्तमानपत्र | 50 | 72.5 |

आलेख क्रमांक : 10





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 10 दर्शविते की 72.5% विद्यार्थी वाचक रोजगार विषयक वर्तमानपत्र सेवांचा उपयोग करणारे आहेत तर 27.5% विद्यार्थी वर्तमानपत्र कात्रण सेवेचा उपयोग करतात.

**तक्ता क्र. 11 : वर्तमानपत्र वाचण्याचे ध्येय**

| वर्तमानपत्र वाचण्याचे ध्येय | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| वाचन आणि लेखन कौशल्य विकसित करण्याकरिता | 31 | 44.3 |
| चालू घडामोडी वर अपडेट राहण्याकरिता | 47 | 67.1 |
| सामान्य ज्ञान मिळविण्याकरिता | 33 | 47.1 |
| मनोरंजनाकरिता | 15 | 21.4 |
| इतर | 5 | 7.1 |

Volume - 4 (2024)
Issue - 2 (April)
LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science
ISSN
2583-2549

आलेख क्रमांक : 11





वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 11 वर्तमानपत्र वाचनामागील विविध हेतू स्पष्ट करते. 67.1% विद्यार्थ्यांचे चालू घडामोडींबाबत अद्यावत राहणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. सामान्य ज्ञान मिळविणे 47.1%, वाचन आणि लेखन कौशल्ये विकसित करणे 44.3%, मनोरंजनाकरिता 21.4% आणि 7.1% विद्यार्थ्यांचे वर्तमानपत्र वाचनामागील इतर हेतू आहेत.

**तक्ता क्रमांक 12 : ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्र सेवेबाबत संतुष्टता**

| वर्तमानपत्र सेवेबाबत | विद्यार्थी संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| समाधानी | 70 | 100 |
| असमाधानी | 00 | 00 |

आलेख क्रमांक : 12



वरील आलेख आणि तक्ता क्रमांक 12 दर्शविते की अभ्यासात सहभागी विद्यार्थी ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्र सेवेबाबत प्रभावित झालेले दिसून येतात. अभ्यासावरून दिसून येते कि सध्याच्या इलेक्ट्रॉनिक युगात विद्यार्थी वर्तमानपत्राचे प्रिंट स्वरूप सोबतच ई-वर्तमानपत्र सुद्धा वाचायला प्राधान्य देत आहेत.

**अभ्यासाचे निष्कर्ष :**

विद्यार्थ्यांची वृत्तपत्र वाचनाच्या सवयींशी संबंधित मते जाणून घेण्यासाठी 11 प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली होती. महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वाचन कक्षाच्या उपयोग करणाऱ्या 70 विद्यार्थ्यांनी सर्वेक्षणात भाग घेतला . सर्वेक्षणातील तथ्ये आणि निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत:-

1. प्रस्तुत अभ्यासात सहभागी झालेल्या 70 विद्यार्थ्यांपैकी 62 विद्यार्थी पदवीधर आणि 8 विद्यार्थी महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागाचे होते.
2. 70 विद्यार्थ्यांपैकी,49 विद्यार्थी 21 वर्षांपेक्षा कमी वयोगटातील, 16 विद्यार्थी 21-25 वर्षे वयोगटातील तर 3 विद्यार्थी 25-30 वयोगटातील आणि 2 विद्यार्थी 30 वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील होते.
3. अभ्यासातुन स्पष्ट होते कि ग्रंथालयातील वाचन कक्षाचा उपयोग करणाऱ्या अभ्यासात सहभागी बहुतेक 100% विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र वाचण्याची आवड आहेत.
4. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्र वाचनाकरिता वर्तमानपत्राचे पसंतीचे स्वरूपबद्दल 58.6% विद्यार्थ्यांनी प्रिंट स्वरूपाला तर 41.4% विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपाला पसंती दर्शविली.
5. 70 विद्यार्थ्यांपैकी ,71.4% विद्यार्थी वर्तमानपत्र वाचण्याकरिता इंटरनेटचा वापर करतात.
6. अधिकाधिक 72.9% विद्यार्थी वर्तमानपत्राचे वाचन कधी कधी करतात तर 27.1% विद्यार्थी दररोज वर्तमानपत्राचे वाचन करतात .
7. 70 विद्यार्थ्यांपैकी ,67.1% विद्यार्थी अर्धा तास पेक्षा कमी वेळ वर्तमानपत्राचे वाचन करतात, 30% विद्यार्थी एक तासापेक्षा कमी वेळ, तर दोन तासापेक्षा जास्त वेळ वर्तमानपत्राचे वाचन करणारे विद्यार्थ्यांची संख्या फक्त 2.9% आहेत.
8. 72.9% विद्यार्थ्यांना मराठी भाषेत ,34.3% विद्यार्थ्यांना हिंदी भाषेत तर 15.7% विद्यार्थ्यांना इंग्रजी मध्ये वर्तमानपत्र वाचायला आवडते. काही विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त भाषेत वर्तमानपत्र वाचायला आवडतात असे दिसून आले.
9. 58.6% विद्यार्थ्यांना राजकीय विषयावरील बातम्या वाचायला आवडते, 51.4% विद्यार्थ्यांना शैक्षणिक बातम्या, 45.7% विद्यार्थ्यांना सामाजिक विषयावरील बातम्या वाचायला आवडते तर सर्वात कमी 10% संपादकीय माहिती वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आहे. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक ज्ञान प्राप्त करण्याकरिता अन्य विषयांशी संबंधित बातम्या सुद्धा वाचावी या करिता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याची व प्रयत्न करण्याची गरज आहे.
10. 72.5% विद्यार्थी वाचक रोजगार विषयक वर्तमानपत्र सेवांचा उपयोग करणारे आहेत तर 27.5% विद्यार्थी वर्तमानपत्र कात्रण सेवेचा उपयोग करतात.

11. विद्यार्थी ग्रंथालयात वर्तमानपत्राचे वाचन विविध उद्देशपूर्ती करिता करतात. अभ्यासातून असे दिसून आले की वर्तमानपत्र वाचनामागील 67.1% विद्यार्थ्यांचे मुख्य हेतू चालू घडामोडींबाबत अद्यावत राहणे आहे.
12. अभ्यासातून असे दिसून आले की ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या वर्तमानपत्र सेवेबाबत अधिकांश विद्यार्थी समाधानी आहेत.

**संदर्भ :**


- https://marathischool.in/vruttapatrache-mahatva nibandh/#google_vignette
- https://vishwakosh.marathi.gov.in/32935/
- Naseri Sampada Ed., Inculcation of Reading Habit -A Major challenge Before India ; Proceedings of the National Conference on Inculcation of Reading Habit -A Major challenge Before India,2012.
- https://digitalcommons.unl.edu/libphilprac/6458
- https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B5%E0%A5%83%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%A4%E0%A4%AA%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%B0